प्राप्त दिनांक : २०.०९.२०१२
नोंदणी दिनांक : २०.०९.२०१२
घोषित दिनांक : १५.११.२०१६
कालावधी : ०४व. ०१म. २५दि.

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सडक अर्जुनी, जि. गोंदिया यांच्या न्यायालयात**
{पीठासीन अधिकारी श्री. विशाल अ. साठे}

नियमीत फौजदारी खटला क्र. ६३/२०१२ नि.क्र.३६

महाराष्ट्र सरकार
मार्फत पोलीस ठाणे, अधिकारी,
डुग्गीपार, ता. सडक अर्जुनी,
जि. गोंदिया. .... सरकार पक्ष

...........**विरुध्द**...........

१. राजेश प्रेमलाल पटले
वय: २४ वर्ष, व्यवसाय: शेती
२. टेकेश्वर प्रेमलाल पटले
वय: ३३ वर्ष, व्यवसाय: शेती
३. प्रेमलाल नंदु पटले
वय: ६५ वर्ष, व्यवसाय: मजुरी
४. सौ. कविता टेकेश्वर पटले
वय: २५ वर्ष, व्यवसाय: मजुरी
वरील सर्व राहणार: धानोरी,
ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया. .... आरोपी

**कलम ४९८-अ सहकलम ३४ भारतीय दंड विधान, १८६०.**

..........................................................................................................
के. के. चौरसीया, विव्दान सरकारी अभियोक्ता
**उपस्थिती :**
आरोपी तर्फे विव्दान वकील व्ही. डी. रहांगडाले
..........................................................................................................

## न्यायनिर्णय
**(दिनांक १५.११.२०१६ रोजी घोषित)**

१. आरोपींना कलम ४९८-अ सहकलम ३४ भारतीय दंड विधान, १८६० अन्वये दोषारोपीत करण्यात आले आहे. **(यापुढे भा.दं.वि. असे संबोधण्यात येईल.)**

२. प्रकरणातील घटनेची थोडक्यात हकीकत अशी आहे की:

सन २००९ ते २३.०६.२०१२ रोजीच्या दरम्यान मौजा धानोरी येथे

आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी योगिता राजेश पटले हिला क्रुर वागणुक दिली. म्हणून फिर्यादीने आरोपींविरूध्द पोलीस ठाणे डुग्गीपार येथे फिर्याद दिली. सदर फिर्यादवरून आरोपींविरूध्द गुन्हा क्रमांक ६५/२०१२ अन्वये कलम ४९८-अ सहकलम ३४ भा.दं.वि. खाली शिक्षापात्र अपराधाकरिता गुन्हा नोंदविण्यात आला.

३. एन.पी.सी. हिवराज परसमोडे यांनी फिर्यादीची फिर्याद घेतली व आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविला. त्यानंतर तपासी अंमलदार श्री. बहादुर धुर्वे यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले, आरोपींना अटक केली व तपासअंती आरोपींविरूध्द कलम ४९८-अ सहकलम ३४ भा.दं.वि. खाली शिक्षापात्र अपराधाकरिता दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरूध्द माझे विव्दान पुर्व न्यायदंडाधिकारी यांनी नि.क्र. ०३ वर कलम ४९८-अ सहकलम ३४ भा.दं.वि. खाली शिक्षापात्र अपराधाकरिता दोषारोप निश्चित केला. त्यातील मजकूर आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला. त्यावर, आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांचेवर फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली.

५. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाचा पुरावा पाहता निर्णयासाठी उपस्थीत मुद्दे व त्यावरील माझा निष्कर्ष पुढीलप्रमाणे:-

| *अनु* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, सन २००९ ते दिनांक २३.०६.२०१२ रोजीच्या दरम्यान आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी योगिता राजेश पटले हिला क्रुर वागणुक दिली व अशाप्रकारे कलम ४९८-अ सहकलम ३४ भा.दं.वि. खाली शिक्षापात्र अपराध केला? | सिध्द केले नाही |
| २ | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता. |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षाने आरोपींवरील दोषारोपीत गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र. १ योगिता राजेश पटले व साक्षीदार क्र. २ अरविंद ब्रिजलाल

रहांगडाले यांना अनुक्रमे नि.क्र. ३२ व ३५ वर तपासले आहे.

त्यानंतर विव्दान सरकारी वकीलांनी अभियोगपक्षाचा पुरावा बंद केल्याचे घोषित केले.

आरोपींविरूध्द कुठलाही सबळ पुरावा मिळून न आल्याने आरोपींची जबानी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात आली नाही.

**<u>मुद्‌दा क्र. १ करिता :-</u>**

७. आरोपींवरील दोषारोपीत गुन्हा पूर्णपणे व नि:संशय सिध्द करण्याची जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते हे फौजदारी कायदयाचे तत्व आहे. या तत्वानुसार सदर प्रकरणामध्ये घटनेच्या दिवशी, वेळी व स्थळी आरोपींनी आपसात संगणमत करून फिर्यादी योगिता राजेश पटले हिला क्रुर वागणुक दिली हे नि:संशयपणे सिध्द करणे अनिवार्य आहे.

८. या अनुषंगाने अभियोग पक्षाच्या वतीने घेतलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्र. १ योगिता ही स्वत: फिर्यादी व घ ाटनेची प्रत्यक्ष बळी असुन साक्षीदार क्र. २ अरविंद हे स्वंतत्र साक्षीदार आहे. परंतु, या दोघांनीही अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये त्यांना घटनेबाबत काही माहित असल्याचे, आरोपींविरुद्ध पोलिसांत फिर्याद अथवा बयाण दिल्याचे व आरोपींनी फिर्यादीला क्रुर वागणुक दिल्याचे साफ नाकारले. विव्द्वान सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारास उलट-तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारले असता काहीही निष्पन्न झाले नाही. त्यामुळे या साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षास काही एक उपयोगाची नाही.

९. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात वरती उल्लेख केलेल्या दोन साक्षीदारा व्यतिरीक्त इतर कुठल्याही साक्षीदारांना तपासले नाही. खरे पाहता फिर्यादी साक्षीदार सा.क्र. १ योगिता यांच्या फिर्यादवरुनच आरोपींना दोषारोपीत करण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी त्यांची बाजू खंबीरपणे मांडणे अपेक्षित होते. परंतु तसे न करता फिर्यादीने तिच्या साक्षीमध्ये आरोपींविरूध्द दोषग्राह्य असे काही सांगितले नाही. त्याचबरोबर फिर्यादी व आरोपींनी निशाणी क्रमांक ३१ वर संयुक्त पुरसीस दाखल करून त्यांच्यातील वाद आपसी समझोत्याने मिटला असल्याचे कथन करून त्यांना सदर प्रकरण आता पुढे चालवायचे नसल्याचे

प्रतिकथन केले.

म्हणून वरील सर्व बाबींचा विचार करता, मी या निष्कर्षापर्यंत आलो आहे की, घटनेच्या दिवशी, वेळी व स्थळी आरोपींनी दोषारोपीत गुन्हा केला हे दर्शविणारा तिळमात्रही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. करिता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परिणामी मी मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देतो व मुददा क्र. २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. आरोपी राजेश प्रेमलाल पटले, टेकेश्वर प्रेमलाल पटले, प्रेमलाल नंदु पटले व सौ. कविता टेकेश्वर पटले यांना कलम ४९८-अ सहकलम ३४ भा.दं.वि. खाली शिक्षापात्र अपराधातून, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ नुसार आरोपींचे पुर्वीचे जमानती बंधपत्र आजपासून पुढील ६ महिन्याकरिता अखंडीत ठेवण्यात येते.

३. न्यायनिर्णय आरोपी, आरोपीचे वकील आणि सरकारी वकील यांच्या समक्ष घोषित.

(विशाल अ. साठे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
सडक अर्जुनी

सडक अर्जुनी
दिनांक : १५.११.२०१६

**प्रमाणपत्र**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द-न-शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : दिनेशकुमार चेतनलाल साकुरे

न्यायालयाचे नाव : (विशाल अ. साठे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सडक अर्जुनी

दिनांक: १५.११.२०१६

पिठासिन अधिकारी यांनी न्यायनिर्णयावर सही केलेली तारीख: १५.११.२०१६

न्यायनिर्णय अपलोड करण्यात आल्याची तारीख: १५.११.२०१६